

बिछडे सभी बारी बारी... - कैफी आझमी

साम्यवादी शायर कैफी आझमींची गीतं संगीतप्रेमींच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहतील. त्यांनी लिहिलेल्या अनेक अविस्मरणीय गीतांना आठवून त्यांना वाहिलेली ही शब्द-श्रद्धांजली.

विजय अकेला

तीन ते चार वर्षांच्या काळात अन्जान, इंदिवर, प्रदीप, हसरत, मजरुह, प्रेमधवन, अली सरदार जाफ्री आणि आनंद बक्षीनंतर १० मे रोजी कैफी आझमी यांचं झालेलं निधन त्यांनीच १९५९ मध्ये *कागज के फूल*साठी लिहिलेल्या एका गाण्याच्या ओळींची आठवण करून देतात–

देखी जमाने की यारी, बिछडे सभी बारी बारी...क्या लेके मिले अब दुनिया से, आसू के सिवा कुछ पाया नही...या फूल ही थे दामन से, या काँटो की भी आस नही... मतलब की दुनिया है सारी

बिछडे सभी बारी बारी
देखी जमाने की यारी

असं म्हणतात की, उत्तर प्रदेशातील आझमगढ जिल्ह्यातील मजवा नावाच्या एका छोट्याशा गावातील शिया कुटुंबात १५ जानेवारी १९२० रोजी अतहर हुसेन रिझवी ऊर्फ कैफी आझमी यांचा जन्म झाला. 'असं म्हणतात' यासाठी की आपला जन्मदिवस आणि वर्ष खुद्द कैफींना ठाऊक नव्हते. ते म्हणत की, मी गुलाम भारतात जन्माला आलो, स्वतंत्र भारतात जगतोय आणि समाजवादी भारतात अखेरचा श्वास घेईन.

शेरो-शायरीची आवड त्यांना बालपणापासून होती. पण त्यांनी पहिलं सिनेगीत १९५१ मध्ये *बुजदिल* चित्रपटासाठी लिहिलं.

रोते रोते गुजर गयी रात रे
आयी याद तेरी हर बात रे
नींद भी मेरी न मेरी हो सकी
रो के शबनम भी न यह गम धो सकी
थी मै तेरी पर न तेरी हो सकी
रोते रोते गुजर गयी रात रे

त्यानंतर *बहु बेटी, गुलबहार, सखी हातिम, हातिमताई की बेटी, नाता, यहूदी की बेटी*सारख्या दोनशे चित्रपटांसाठी एकाहून एक गीत लिहिलं. त्यातील काही अविस्मरणीय गीतं सांगायची तर... वक्त ने किया क्या हसी सितम, तुम रहे ना तुम हम रहे ना हम

कागज के फूल (१९५९)

बैठे है रह गुजर पे दिल का दिया जलाए, शायद वो दर्द जाने, शायद वो लौट आये

चालीस दिन (१९५९)

तुम्हारी झुल्फ के साये मे शाम कर लूंगा, सफर हर उम्र का पल मे तमाम कर लूंगा...

नैनिहाल (१९६७)

मिले न फूल तो काटों से दोस्ती कर ली
किसी तरह से बसर हमने जिंदगी कर ली...

अनोखी रात (१९६२)

ये दुनिया ये महेफिल मेरे काम की नही
मेरे काम की नही...

हिररांझा (१९७०)

चलते चलते यू ही कोई मिल गया था
सरे राह चलते चलते

हसते जख्म (१९७३)

हर तरफ अब यही अफसाने है
हम तेरी आखों के दिवाने है...

हिंदुस्थान की कसम (१९७३)

माना हो तुम बेहद हसी
ऐसे बुरे हम भी नही...

टुटे खिलौने (१९७२)

जाने क्या ढुंढती रहती है आंखे मुझ मे
राखे के ढेर मे शोला है न चिंगारी है

शोला और शबनम (१९६१)

राह बनी खुद मंजिल, पिछे रह गई मुश्किल
साथ जो आए तुम

कोहरी (१९६४)

हो के मजबूर उसने भुलाया होगा
जहर चुपके से दवा जान के खाया होगा...

हकीकत (१९६४)

तेरा हुस्न रहे मेरा इश्क रहे
तो ये सुबह, ये शाम रहे न रहे

दो दिल (१९६५)

बहारो मेरा जीवन भी सवारो
कोई आये कही से यू पुकारो

आखिरी खत (१९६६)

धीरे-धीरे मचल, ए दिल-ए-बेकरार
कोई आया है

अनुपमा (१९६६)



कन्या शबाना, पुत्र बाबा आझमी, पत्नी शौकत आझमी, जावई जावेद आणि सून तन्वीसमवेत कैफी.

तुम इतना क्यो मुस्करा रहे हो
क्या गम है जिसको छुपा रहे हो...
अर्थ (१९८२)

जलता है बदन
प्यास भडकी है सर-ए-शाम से
जलता है बदन
रजिया सुलतान (१९८३)

आनेवाला कल एक सपना है
गुजरात हुआ कल बस अपना है
फिर तेरी कहानी याद आयी (१९९३)

कैफी यांनी समाजकारण आणि चित्रपट दोन्ही क्षेत्रांत उत्कृष्ट काम केलं. त्यांच्या गीतांमध्ये एक विचार, एक अभिव्यक्ती, एक क्रांती, एक शक्ती, एक उद्देश असायचा. फिल्मी सिच्युएशनला देखील आपल्या गीतातून ते एक अर्थपूर्ण सिच्युएशन बनवत.

कैफी एक क्रांतिकारक शायर होते आणि तसेच राहिले. *हिररांझा*तील ये दुनिया ये महफील मेरे काम की नही...'मध्ये ते लिहितात.

'उनको खुदा मिले है खुदा की जिन्हे तलाश
मुझ को तो इक झलक मेरे दिलदार की मिले'

*हकीकत*च्या 'कर चले हम फिदा जाने तन ओ साथियों...'मध्ये ते लिहितात.

'जिंदा रहने के मौसम बहुत है मगर
जान देने की रूत रोज आती नही
हुस्न और इश्क दोनो को रुसवा करे
वो जवानी जो खुँ मे वहाती नही
आज धरती वनी है दुल्हन साथियो


*हकिकत*मधील आणखी एक गीत 'हो के मजबूर मुझे उसने भुलाया होगा...' हे त्यांच्याच 'अंदेशे' नामक कवितेचा हिस्सा आहे. ही कविता त्यांनी खूप वर्षांपूर्वी लिहिली होती.

'रुह बेचैन है एक दिल की अजीयत क्या है
दिल की शोला है तो ये सोज-ए-मोहब्बत क्या है
वो मुझे भुल गयी इसकी शिकायत क्या है
रंज तो ये है की रो-रो के भुलाया होगा...'

या कवितेसंदर्भात कैफींचे जावई (शबाना आझमींचे पती) जावेद अख्तर म्हणतात, 'एकेकाळी संपूर्ण देश या कवितेचा चाहता बनला होता. आम्ही तेव्हा तेवढे परिपक्वही नव्हतो. तरी या सुरेख कवितेने प्रेमात धुंद होण्याची इच्छा आमच्यात निर्माण केली होती.'



कैफी: उत्कृष्ट शायर आणि समाजकारणीही.



तरुणपणीचे शौकत आणि कैफीसमवेत शबानाचं चित्र.

कैफी म्हणतात की, मी सोशॅलिस्ट हिंदुस्थानासाठी एक शिपाई बनून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर लढाई लढली.

गेली काही वर्षं ते मुंबईऐवजी आझमगढमध्येच राहात होते. 'मुंबईत मी नसण्याचा तिला काही फायदा होत नसला तरी आझमगढला फायदा होतोय असं ते म्हणत. त्यांनी तिथे रस्ते तयार करायला मदत केली. मुलींसाठी शाळा उघडल्या. मुंबईच्या चित्रपटसृष्टीबद्दल त्यांची अलीकडची प्रतिक्रिया अशी होती की, 'एकेकाळी या इंडस्ट्रीत फिल्ममेकर होते. आता मनी मेकर आलेत. पूर्वी चित्रपटनिर्मिती कला समजली जायची आता ती धंदा बनलीय.

कैफींनी झंकार (१९४३), आखिर-ए-शब (१९४७), आवारा सज्दे (१९७३) आणि सरमाया (१९७२) हे कवितासंग्रह लिहिले. *मेरी आवाज सुनो* नावाचा त्यांचा एक सिनेगीतांचाही संग्रह आहे. उत्तर प्रदेश ऊर्दू अकादमी आणि साहित्य अकादमीच्या पुरस्कारांनी ते सन्मानित होते. सोव्हिएट लॅण्ड नेहरू पुरस्कार, अफ्रो एशियाई लेखक संघाचा लोटस पुरस्कार, गालिब पुरस्कार आणि हिंदी अकादमी तसंच दिल्लीच्या शताब्दी पुरस्काराचेही ते मानकरी ठरले.

कैफींचे वडील फतेह हुसेन रिझवी जमीनदार होते. ते स्वत: आणि कैफींसहित त्यांची पाचही मुलं शायर होती.

कैफी म्हणत, 'शायरीचा वारसा मला जन्मजात मिळाला, पण राजकारण माझ्यात कुठून आलं ते कळत नाही. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लखनौ येथे येऊन काँग्रेस पक्षात सामील झालो आणि माझ्या जीवनातील क्रांतिकारक शायरीचं पर्व सुरू झालं. तेव्हा पंडित नेहरू आमचे आवडते नेते होते. ते आक्रमक भाषणं करीत, पण वागत मात्र गांधीजी सांगत तसे. आम्हाला गांधीजींचं अहिंसात्मक आंदोलन तेव्हा पटत नसे. आता असं वाटतं की, त्यांच्याशिवाय भारताला कधीच स्वातंत्र्य मिळालं नसतं.'

कैफी यांच्या पत्नीचं नाव शौकत. कैफींच्या समाजकारणात त्यांची अखेरपर्यंत साथ राहिली. तर कन्या शबाना समाज कार्यकर्त्या म्हणूनच प्रसिद्ध आहेत. आपल्या वडिलांचा त्यांना खूप अभिमान वाटतो. त्या म्हणतात, 'पन्नास वर्षांपूर्वी कुणी आपल्या सहचारिणीला रूढी-परंपरांच्या जोखडातून मुक्त व्हायला सांगून आपल्याबरोबर चालायला सांगतो तेव्हा त्याचं कौतुक व्हायलाच हवं.'

शबाना असं म्हणतात तेव्हा त्यांचा इशारा कैफींच्या पुढील कवितेकडे असतो.

'उठ मेरी जान मेरे साथ ही चलना है तुम्हे
कद्र अब तक तेरी तवारिख ने जानी ही नही
तुझसे शोले भी है बस अश्क फिशानी ही नही
तू हकिकत भी है दिलचस्प कहानी ही नही
अपनी तारीख का उनदान बदलना है तुझे'

कैफी यांच्यातील बंडखोर शायर स्त्री-पुरुष समानतेचाही कसा भोक्ता होता याची यावरून कल्पना यावी.